# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे

| | |
|---|---|
| अतिरिक्त संचालक<br>दुरध्वनी क्रमांक (वैयक्तिक)<br>०२०-२६०५८९९६ | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण,<br>माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटुंब कल्याण भवन, राजा बहादूर मिल रोड, पुणे रेल्वे.स्टेशन मागे, पुणे — ४११००१, दुरध्वनी— ०२० — २६०५८७३९, २६०५८१३९, २६०५८४७६<br>Email - sfwbmiscell9@gmail.com |
| आरोग्य सेवा | जा.क्र.राकुकका/लोवमू/कुटुंब कल्याण कार्यक्रम/उदिदष्टाबाबत/कक्ष ९अ/नस्ती क्र.२६२/ ३२६३९ - ४३९ /१८, दिनांक :- २५ / ०५ /२०१८ |

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,..................सर्व

२) जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय,...................सर्व

३) वैदयकिय आरोग्य अधिकारी,महानगरपालिका,..............सर्व

४) कार्यकारी आरोग्य अधिकारी,बृहन्मुंबई महानगरपालिका

**विषय :- आरोग्य सेविका,सेवक यांना दिलेले कुटुंब कल्याण कार्यक्रमाचे उदिदष्टाबाबत.**

**संदर्भ:-** १) जिल्हा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ,पुणे यांचे पत्र क्र ११५/ आवि/ २०१७,दिनांक ३०/०६/२०१७ व १६६/आवि/२०१७,दिनांक २५/०९/२०१७

२) या कार्यालयाचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य जि.प.आरोग्य कर्मचारी संघटना, जिल्हा परिषद अकोला यांना उददेशुन लिहिलेले पत्र क्र.राकुकका/लोवमू/कुटुंब कल्याण कार्यक्रम/ उदिदष्ठाबाबत/कक्ष९अ/नस्तीक्र.२६२/३९२८०-८७/१७,दिनांक २७/०६/२०१७

**महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ,पुणे यांचे संदर्भ क्र.१ च्या पत्रातील मुददा:-**

महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ,पुणे यांचे संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेला मुददा पुढीलप्रमाणे:-

"राज्यातील आरोग्य विभागात कार्यरत आरोग्य सेविका/सेवक यांना कुटुंब कल्याण कार्यक्रमाच्या उदिदष्ट पुर्तीची कोणतीही सक्ती नसल्याचे निदर्शनास येते.परंतू आजही राज्यातील बऱ्याचशा जिल्हा परिषदेअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविका/सेवक यांना कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेचे कामाचे उदिदष्ट हे फार मोठया प्रमाणात दिले जाते.व ते उदिदष्ट सक्तीचे आहे आणि ते कर्मचाऱ्यांना करावेच लागेल अन्यथा कर्मचाऱ्यांची वेतनवाढ थांबविणे, पगार थांबविणे अथवा गोपनिय अहवाल खराब करणे अशा प्रकारची कार्यवाही कर्मचाऱ्यांवर करण्यात येईल असे वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून कर्मचाऱ्यांना बोलले जाते.अशा होणाऱ्या कार्यवाहीमुळे आरोग्य कर्मचाऱ्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे व तशा तक्रारी संघटनेकडे सुध्दा प्राप्त झालेल्या आहेत."

**वर नमुद मुददयाच्या अनुषंगाने पुनश्चः अधोरेखित करण्यात येत असलेल्या यापूर्वी देण्यात आलेल्या सूचना खालीलप्रमाणे.:-**

या कार्यालयाकडुन लोकसंख्या, संरक्षित जोडप्याचे प्रमाण,एकुण प्रजनन दर इ.बाबी विचारात घेऊन जिल्हा व महानगरपालिका क्षेत्रांकरिता वार्षिक अपेक्षित कामाची पातळी ठरवुन दिली जाते. जिल्हे व मनपांकडून त्यांच्या अधिनस्त संस्थांना वार्षिक अपेक्षित कामाची पातळी वितरित करण्यात येत असते.

कर्मचाऱ्यांवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेच्या केसेस आणण्याची सक्ती करण्याचे कोणतेही निर्देश दिलेले नाहीत व कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेच्या केसेस आणण्याची सक्तीबाबत परिपत्रक/ शासन निर्णय नाही.

**जिल्हयातील कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेची अपेक्षित कामाची पातळी पुर्ण करण्याच्या दृष्टीने सर्व कर्मचाऱ्यांनी असरंक्षित जोडप्यांना कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी प्रवृत्त करण्याबाबत प्रशासनाकडुन सुचविले जाते.**

लोकसंख्या वाढीस नियंत्रण करण्यासाठी कुटुंब कल्याण कार्यक्रम महत्वाचा घटक आहे. कुटुंब कल्याण कार्यक्रम ऐच्छिक स्वरुपाचा असून केंद्र शासनाने आखून दिलेल्या मार्गदर्शक

तत्वानुसार Target free approach पध्दतीने राबविण्यात येतो. कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत कुटुंब नियोजन पध्दती वापरण्याबाबतच्या पध्दती ऐच्छिक (Cafeteria Choice) स्वरुपाच्या असल्याने, परिवाराने कोणत्या पध्दतीचा अवलंब करावा याबाबत सक्ती नाही.

**कुटुंब कल्याण कार्यक्रमात वाढ होण्याच्या दृष्टीने जिल्हे/मनपा यांचेकडून अपेक्षित कार्यवाही :-**

- जिल्हे व मनपा यांनी वर नमुद केलेल्या सुचनांची तात्काळ अंमलबजावणी करावी तसेच आपले अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास सदर सुचना आणून दयाव्यात.
- लोकसंख्या वाढीस नियंत्रण करण्यासाठी कुटुंब कल्याण कार्यक्रम महत्वाचा घटक असल्याने सर्व आशा व आरोग्य कर्मचारी यांना कार्यक्षेत्रातील सर्व जननक्षम जोडप्यांना भेट देऊन कुटुंब नियोजनाच्या तात्पुरत्या व कायमच्या पध्दतीबाबत माहिती देणे व या पध्दतींचा अवलंब करण्यासाठी लाभार्थ्यांस प्रवृत्त करणेसाठी प्रेरित करावे.
- शासकीय आरोग्य संस्थांमध्ये तसेच घरी प्रसुत झालेल्या सर्व मातांची प्रसुती कक्षात अथवा प्रसुती पश्चात कक्षात तसेच घरभेटीव्दारे कुटुंब नियोजनाच्या तात्पुरत्या व कायमस्वरुपी पध्दतींबाबत समुपदेशन करण्यासाठी सर्व वैद्यकीय अधिकारी, परिचारीका,आरोग्य कर्मचारी,आशा कार्यकर्ती यांना लेखी, तोंडी सूचना निरंतरपणे देण्यांत याव्यात. यामध्ये पात्रता, कुटुंब नियोजन पध्दतीच्या वापराने मातेच्या व होणा-या बालकाच्या आरोग्यासाठी होणारे फायदे, आर्थिक लाभ इ. बाबतची माहिती लाभार्थ्यांस सांगण्यात यावी.
- प्रजनन व बालआरोग्य कार्यक्रमांतर्गत कुटुंब नियोजन पध्दतीमध्ये पुरुषांचा सहभाग वाढविण्यासाठी आवश्यक प्रचार व प्रसार करण्यात यावा
- स्त्री व पुरुष नसबंदीचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने तसेच कुटुंब नियोजनाच्या पध्दतींची माहिती व वापराबाबत जनतेमध्ये आरोग्य शिक्षण देण्यात यावे.
- कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यास व आरोग्य संस्थेतील अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात येणारे आर्थिक लाभ तथा मोबदला याबाबत निर्गमित केलेले शासननिर्णय व वेळोवेळी देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना अधिकारी/कर्मचारी यांच्या सातत्याने निदर्शनास आणून दयाव्यात.
- कुटुंब कल्याण कार्यक्रमात संख्यात्मक व गुणात्मक वाढ होण्याच्या दृष्टीने निरंतर प्रयत्न करावेत. दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

**डॉ.(श्रीमती) अर्चना पाटील**
**अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा**
**कुटुंब कल्याण ,माता- बाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे.**

**प्रत माहितीकरिता:-**

१) श्री.संजय घाटे,अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य जि.प.आरोग्य कर्मचारी संघटना,आरोग्य विभाग,जिल्हा परिषद अकोला,ता.जि.अकोला,४४४ ००१
२) श्री.विनय सुदामे, जिल्हा अध्यक्ष, जिल्हा परिषद परिसर, जिल्हा परिषद भंडारा, ४४१ ९०४

**प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीकरिता :-** उपसंचालक, आरोग्य सेवा, प्रभारी मंडळ,............सर्व

**प्रत सविनय सादर :-**

१) विशेष कार्यकारी अधिकारी,राज्यमंत्री, गृह (शहरे) नगर विकास,विधी व न्याय विभाग व संसदीय कार्य,माजी सैनिकांचे कल्याण,कौशल्य विकास आणि उदयोजकता यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२) मा.संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
३) मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
४) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, गो.ते.रुग्णालय आवार, नवीन मंत्रालय, मुंबई